**M.E.S. High School, Bhandup (W)**

I Semester Examination

Sub: Marathi

No of pages 11

Roll. No.: ____

Std: X , Div: __

Date : 22/10/2018

Marks : 100

Time: 3Hrs.

## विभाग 1 - गदय

प्र.1.अ.पुढील उतारा वाचून दिलेल्या सूचनांनूसार कृती करा.

कृती-1

खालील उतारा वाचून खालील घटनाक्रम योग्य अनुक्रमाने लिहा. (2)

1. कडाक्याच्या थंडीने मुलाचे कुडकुडणे.
2. बाळाच्या आईचे प्रवाहातील मासे पकडणे.
3. लेखकाचे नदीकाठच्या प्राज्ञ पाठशाळेच्या खोलीत राहणे.
4. लेखकाने बाईला शाल व पैसे दिले.

एकदा मी पु.ल.देशपांडे यांच्याकडे काही एक निमित्ताने गेलो होतो.काम झाल्यावर मी निघणाच्या बेतात होतो,तेवढयात सुनीताबाईंनी मला थांबवले व विचारले,"तुम्हाला शाल दिली तर चालेल काय?"मी एका पायावर हो म्हटले.पु.ल.व सुनीताबाई यांनी मला शाल दयावी हा मला मोठा गौरव वाटला.ती शाल मी माझ्या खोलीतल्या सुटकेसमध्ये ठेवून दिली.वापरली मात्र कधीच नाही.

पुढे वाईला विश्वकोशाचा अध्यक्ष म्हणून मी गेलो.तिथे नदीकाठच्या प्राज्ञ पाठशाळेच्या खोलीत मी राहत असे.खोलीच्या दक्षिणेकडील खिडक्या कृष्णा नदीच्या चिंचोळया प्रवाहावर होत्या.थंडीच्या दिवसात एक बाई माझ्या खिडकीखालील घाटाच्या छोटया तटावर तिचे छोटे मूल एका टोपलीत ठेवून मासे पकडण्याच्या उदयोगात होती.तिचे बाळ कडाक्याच्या थंडीत कुडकुडत रडत होते,पण आई तिकडे बघतही नव्हती.मला मात्र राहवले नाही.मी सुटकेसमधील 'पुलकित' शाल काढली.पाचपन्नास रुपयांच्या नोटा काढल्या व त्या बाईला हाक मारली.खिडकीतून ते सर्व खाली दिले आणि म्हटले,"त्या बाळाला आधी शालीत गुंडाळ आणि तिथे मासे मारत बैस."या घटनेची ऊब पुलकीत शालीच्या उबेपेक्षा अधिक होती.



कृती-2

खालीलवाक्ये उता-याच्या आधारे पूर्णकरा. (2)

1) खोलीच्या दक्षिणेकडील खिडक्या-----------------
2) या घटनेची ऊबपुलकित---------------------

कृती-3

खालील विशेषण-विशेषांच्या जोडया जुळवा. (2)

| | |
|---|---|
| प्रवाह, थंडी | कडाक्याची |
| मूल, रुपये | छोटे |
| | पाचपन्नास |
| | चिंचोळा |

कृ-4 स्वमत

या उता-यातून लेखकाचे तुम्हांला जाणवलेले स्वभावविशेष लिहा.(2)

प्र.1.ब. पुढील उतारा वाचून दिलेल्या सूचनांनूसार कृतकिरा. (2)

कृती 1 आकलन कृती

उता-यात आलेले चार वाक्प्रचार

(1)

(2)

(3)

(4)



Scanned by CamScanner

माझ्या खाजगी उपोषणाची हकीकत चाळीत जाहीर झाली आणि येता - जाता ही माझी नाही ती भानगड आहे, उगीच हात दाखवून अवलक्षण आहे, पेललं नाही तेव्हा खाजगी झालं ।' अशी वाक्ये माझ्या कानांवर येऊ लागली, पण मी कोणत्याही टीकेला भीक घालणार नव्हतो, 'एकशे एक्क्याऐंशी पौंड' रात्रंदिवस ते कार्ड माझ्या डोळ्यापुढे नाचत होते. वजन कमी झाले पाहीजे. या विचाराने माझी झोप उडाली. झोप कमी झाली तर वजन उतरते या विचाराने मला त्याचेही काही वाटत नव्हते. मी पूर्वीसारखा गाढ झोपत नाही यावर धर्मपत्नीचा मात्र अजिबात विश्वास नव्हता." घोरत तर असता रात्रभर !" अशासारखी दुरुत्तरे ती मला करत असे.

"दोन महिन्यात पन्नास पौंड वजन कमी करुन दाखवीन खरा !" अशी भीष्मप्रतिज्ञा करुन मी आहारशास्त्रावरच्या पुस्तकात डोके घालू लागलो. प्रोटीनयुक्त पदार्थ, चरबीयुक्त द्रव्ये वगैरे शब्दांबद्दलची माझी आस्था वाढू लागली. सा-या ताटांतले पदार्थ न दिसता नुसत्या 'कॅलरीज' मला दिसू लागल्या आणि आनंदाची गोष्ट अशी, की वजन उतरवण्याच्या शास्त्रात पारंगत झालेले तज्ञ मला रोज डझनवारी भेटू लागले इतकेच काय, परंतु "या आमच्या चाळीतल्या लोकांनी माझ्या उपासाची अवहेलना केली होती, त्यांनीच मला 'डाएटचा 'सल्ला दिला. उदाहरणार्थ-सोकोजी त्रिलोकेकर.

कृती-2

खालील प्रश्नांची प्रत्यकी एका वाक्यात उत्तरे लिहा. (2)

1.) लेखकाने कोणती भीष्मप्रतिज्ञा केली ?

2.) कोणत्या विचाराने लेखकाची झोप उडाली ?

कृती-3

खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा. (2)

1) रात्र 2) कमी 3) विश्वास 4) आस्था

कृती-4.स्वमत-

'प्रतिज्ञा करणे सोपे, पण निभावणे कठीण' या विषयीचे तुमचे मत लिहा (2)



प्र.1 .क.खालील उतारा वाचून सुचनेनुसार कृती करा

1)परदेशातल्या लोकांना आवडणे

2)मस्तानम्माचे चूल पेटवणे

3) फटाफट लाईक्स, कमेंट्स मिळत गेले

4) शेतातल्या शेतात फटाफट स्वयंपाक रांधणे

श्रीनाथ आणि लक्ष्मण या दोघा मित्रांच्या मनात यूट्यूबवर आंध्र प्रदेशातील खाण्या-पिण्यावर काहीतरी करावं असं सारखं घोळत होतं. म्हणून त्यांनी कंट्री फूडस् या नावाने यूट्यूबवर एक चॅनल सुरु केलं. पण म्हणावा तसा प्रतिसाद मिळत नसल्यामुळे ते नव्या कल्पनेच्या शोधात लक्ष्मणच्या गावाला आले. त्यांची चर्चा ऐकून लक्ष्मणच्या आईनेच त्यांना सुचवलं, मस्तानम्मा इतका चांगला स्वयंपाक करते, तर तिचाच का नाही व्हिडिओ करत ?

हे काहीतरी वेगळं वाटून त्यांनी मस्तानम्मांचा एक व्हिडिओ काढायचा ठरवलं. प्रयोग म्हणून वांगी घेऊन ते शेतात गेले. आणि तिकडेच चूल मांडून मस्तानम्माला भाजी करायला सांगितली. तीन दगडांच्या चुलीवर शिजवलेली ती वांगी यूट्यूबवर गेली आणि कंट्री फूडसवर कमेंटसचा अक्षरशः पाऊस पडला. तिचं ते चूल पेटवणं, शेतातल्या शेतात फटाफट स्वयंपाक रांधणं, त्यातली करकरीत मजा हे सगळंच परदेशातल्या लोकांना आवडलं फटाफट लाईक्स, कमेंट्स मिळत गेले.

कृती-2

खालील वाक्ये पूर्ण करा. (2)

1)पण म्हणावा तसा प्रतिसाद मिळत नसल्यामुळे ते-------

2)प्रयोग म्हणून वांगी घेऊन ते शेतात गेले, आणि---------

कृती-3

1) खालील वाक्यातील उभयान्वयी अव्यय शोधून लिहा. (1)

तीन दगडांच्या चुलीवर शिजवलेली ती वांगी यूट्यूबवर गेली, आणि कमेंट्सचा अक्षरशः पाऊस पडला.

2) खालील नामांसाठी कंसातील योग्य विशेषणे शोधून लिहा (1)

1)----------------मजा 2)----------स्वयंपाक

(भन्नाट, तिखटजाळ, चांगला) [2]

कृती- 5 - स्वमत

तुम्हाला स्वयंपाक करण्याची संधी मिळाली तर, तुम्ही काय कराल याविषयी लिहा



Scanned by CamScanner

## विभाग-2-पदय

प्र.2.रा.अ)-पुढील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.

कृती-1 (2)

कोण ते लिहा.

1) अग्नीत पडलेल्या बाळाला वाचवण्यासाठी धावते-
2) पिले धरणीवर पडताच झेप घेते-
3) भुकेल्या वासरांसाठी हंबरत येते-
4) वणवा लागलेल्या वनात अडकलेल्या पाडसाला सोडवण्यासाठी येते-

अग्नीमाजी पडे बाळू ।माता धावे कनवाळू ॥1॥
तैसा धावे माझिया काजा ।अंकिलांमी दास तुझा ॥2॥
सेवेंची झेपावे पक्षिणी ।पिली पडतांची धरणी ॥3॥
भुकेले वासरावें। धेन हंबरत धांवे ॥4॥
वणवा लागलास वनीं । पाडस चिंतित हरणी ॥5॥
नामा म्हणे मेघा जैसा ।विनवितो चातक तैसा ॥6॥

कृती-2 (2)

पुढील शब्दांसाठी कवितेतील समानार्थी शब्द शोधून लिहा.

1) ढग- 2) गाय- 3)नोकर- 4)आई-

कृती-3 (2)

खालील ओळीचे अर्थ स्पष्ट करा.नामा म्हणे मेघा जैसा।विनवितो चातक तैसा

कृती-4 (2)

अभिव्यक्ती

आई व बालकाचे नाते तुमच्या शब्दांत लिहा

प्र.2.आ)कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.

कृती-1



चौकटी पूर्ण करा. (2)

1) कवीच्या साहाय्यास धावून आले-
2) कवीने हरघडी हिचा विचार केला-
3) ही गोष्ट शोधण्यास कवीची जिंदगी बरबाद झाली-
4)दारिद्र्याकडे गहाण पडलेले

दोन दिवस वाट पाहण्यात गेले ;दोन दुःखात गेले.
हिशोब करतो आहे किती राहिलेत डोईवर उन्हाळे
शेकडो वेळा चंद्र आला; तारे फुलले,रात्र धुंद झाली,
भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली,
हे हात माझे सर्वस्व;दारिद्र्याकडे गहाणच राहिले
कधी माना उंचावलेले,कधी कलम झालेले पाहीले
हरघडी अश्रू वाळविले नाहीत; पण असेही क्षण आले
तेंव्हा अश्रूच मित्र होऊन साहाय्यास धाऊन आले.
दुनियेचा विचार हरघडी केला,अगा जगमय झालो
दुःख पेलावे कसे,पुन्हा जगावे कसे ,याच शाळेत शिकलो
झोतभट्टीत शेकावे पोलाद तसे आयुष्य छान शेकले
दोन दिवस वाट पाहण्यात गेले;दोन दुःखात गेले

कृती-2 (2)

एका वाक्यात उत्तरे लिहा.

1) कवी जगाच्या शाळेत कोणती गोष्ट शिकला ?
2) कवी कशाचा हिशोब करतो आहे ?

कृती-3 (2)

'दुःख पेलावे कसे,पुन्हा जगावे कसे,याच शाळेत शिकलो'या काव्यपंक्तीतील तुम्हांला समजलेला विचार तुमच्या शब्दांत लिहा.

कृती-4 (2)

'हे हात माझे सर्वस्व दारिद्र्याकडे गहाणच राहीले या ओळीतील आशय स्पष्ट करा.

प्र.2.ई) खालील ओळीचे रसग्रहण करा.(4)

जळ वरिवरी क्षाळी मळ ।योगिया सबाह्य करी निर्मळ ।
उदक सुखी करी एक वेळ ।योगी सर्वकाळ सुखदाता।

## विभाग-3 स्थूलवाचन

प्र.3.रा.खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा. (6)

1) 'स्काय इज द लिमिट' ही परिस्थिती केंव्हा निर्माण होऊ शकते ते पाठाच्या आधारे लिहा.

2) पणतीच्या उदाहरणातून कवितेत व्यक्त झालेला विचार स्पष्ट करा.

3) तुम्हांला समजलेली कवितेतील सूर्याची भूमिका स्पष्ट करा.

## विभाग-4 भाषाभ्यास

प्र.4 अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती :

1. समास : खालील तक्ता पूर्ण करा. (2)

| अनुक्रमांक | सामासिक | विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|---|
| 1) | बहीणभाऊ | | |
| 2) | भांडीकुंडी | | |

2. अलंकार : खालील उदाहरण वाचून कृती करा. (2)

आईचे प्रेम सागरासारखे असते.

वरील उदाहरणातील i) उपमेय - 

ii) उपमान - 

iii) समानधर्म - 

iv) अलंकार - 

3) खालील सूचनेनुसार बदल करा. (2)

1) वा ! किती गोड तुझा आवाज !(विधानार्थी करा)



2) तू आता लहान नाहीस .(होकारार्थी करा)

4) खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांचे सामान्यरुप व विभक्तीप्रत्यय लिहून तक्ता पूर्ण करा. (2)

वाक्य - त्याने सा-या सेक्शनला पार्टी दिली व लेखकांना बोलावले

| शब्द | सामान्यरुप | विभक्ती प्रत्यय प्रकार |
|---|---|---|
| 1) त्याने | | |
| 2) लेखकांना | | |

5) खालील यादीतील वाक्प्रचार योग्य ठिकाणी वापरुन वाक्ये पुन्हा लिहा. (गमावून बसणे, वर्ज्य करणे, बळी पडणे) (2)

1) मधुमेहामुळे माणसाला साखरेचा त्याग करावा लागतो.

2) माणसाने जीवनात वाईट गोष्टींच्या मोहात अडकता कामा नये

प्र. 4 आ) भाषासौंदर्य

शब्दसंपत्ती

i) खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा . (1)

i) समाजाची सेवा करणारा - 

ii) काव्यरचना करणारा - 

ii) खालील शब्दाचे दोन वेगवेगळे अर्थ लिहा. (1)

हार

iii) गटात न बसणारा शब्द ओळखून लिहा. (1)

i) हिंदी, मराठी, तमिल, सिमला, सिंधी --

ii) तांब्या, भांडे, चमचा, वाटी, उदबत्ती --



Scanned by CamScanner